# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्र.
०२०–२५६२१०४५/४८
/४९
ई–मेल
iqac@unipune.ac.in

गणेशखिंड, पुणे ४११००७
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष

संदर्भ क्र.:आयक्यूएसी/५३४

दिनांक : १३.०७.२०२२

**अत्यंत महत्त्वाचे व तातडीचे**

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/विद्यापीठ विभाग,
प्रस्तुत विद्यापीठ/ **पुणे (जिल्हा व ग्रामीण).**

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाअंतर्गत विद्यार्थ्यांसाठी संशोधन स्पर्धा (अविष्कार, अन्वेषन) इनोव्हेशन परिषद, अध्यापकांचे संशोधन प्रकल्प यासारखे उपक्रम राबविले जातात. शैक्षणिक वर्ष २०२२–२३ मध्ये सदर उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने महाविद्यालये/परिसंस्थेने नेमलेल्या शैक्षणिक व संशोधन समन्वयकांची (ARC) कार्यशाळा खालीलप्रमाणे आयोजित करण्यात आलेली आहे.

१. गुरूवार, दिनांक २१जुलै, २०२२ रोजी **पुणे (जिल्हा व ग्रामीण), श्री. टिकाराम जगन्नाथ कला आणि वाणिज्य महाविद्यालय, खडकी, पुणे–४११ ००३** येथे दुपारी ०२ ते ०५ या कालावधीमध्ये आयोजित करण्यात आलेली आहे.
२. शनिवार, दिनांक २३/०७/२०२३ रोजी अहमदनगर. *
३. रविवार, दिनांक २४/०७/२०२३ रोजी नाशिक. *

**(* स्थळ यथाअवकाश कळविण्यात येईल तसेच तारखेत बदल होण्याची शक्यता आहे.)**

सदर सभेला मा. कुलगुरू व मा. प्र–कुलगुरू उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. तरी आपल्या महाविद्यालये/परिसंस्थेतील नेमणूक केलेल्या **'शैक्षणिक आणि संशोधन समन्वयक' (ARC)** यांची उपस्थिती अनिवार्य असल्याने त्यांना सदर सभेस उपस्थित राहण्याबाबत आपल्या स्तरावरून सुचित करण्यात यावे.

कळावे,

13/07/22

(डॉ. सुप्रिया पाटील)
संचालक
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष